# कार्यावली

## सोमवार, दिनांक १५ जुलै, २०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मुंबई येथील विधान भवनात सुरु होणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१३ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनाची कार्यावली.

**एक** : सभापतींनी, सभापती-तालिका नामनिर्देशित करणे.

**दोन** : प्रश्नोत्तरे.

**तीन** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

**चार** : सन २०१३-२०१४ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

**पाच** : सन २०१३-२०१४ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा.

**सहा** : लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे.

**सात** : सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे.

**आठ** : अंदाज समितीचे अहवाल सादर करणे.

**नऊ** : अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**दहा** : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**अकरा** : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

**बारा** : विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करणे.

**तेरा** : उपविधान समितीचा अहवाल सादर करणे.

**चौदा** : आश्वासन समितीचे अहवाल सादर करणे.

**पंधरा** : विनंती अर्ज समितीचा अहवाल सादर करणे.

**सोळा** : नियम समितीचा अहवाल सादर करणे.

**सतरा** : मंत्र्यांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

**अठरा** : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

**एकोणीस** : शोक प्रस्ताव.

**वीस** : इतर प्रस्ताव.

**एकवीस** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा- म.वि.प.नियम ९७ अन्वये.

**बावीस** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधणे - म.वि.प.नियम १०१ अन्वये.

**तेवीस** : **अशासकीय विधेयके - विचारार्थ -**

**(१)** सन २०११ चे वि.प.वि. क्रमांक ८ - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त

(सुधारणा) विधेयक, २०११. श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांचे.

**(२)** सन २०११ चे वि.प.वि.क्रमांक १३ - महाराष्ट्र सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) विधेयक, २०११ श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे.

**(३)** सन २०११ चे वि.प.वि. क्रमांक ९ - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक, २०११. श्री. विजय सावंत, वि.प.स. यांचे.

**(४)** सन २०११ चे वि.प.वि. क्रमांक ४ - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०११ श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे - **चर्चा अपूर्णावस्थेत.**

**(५)** सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक १ - महाराष्ट्र राज्य सेवा हमी विधेयक, २०१२. श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे.

**(६)** सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक २ - महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती ) विनियमन (सुधारणा) विधेयक, २०१२ श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांचे.

**(७)** सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक ३ - महाराष्ट्र पोलीस विधेयक, २०१२ श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे.

**(८)** सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक ४ - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, २०१२ . श्री. चंद्रकात पाटील, वि.प.स. यांचे.

**(९)** सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक ६ - महाराष्ट्र भिषक व शल्यचिकित्सक (दिवाणी व फौजदारी खटल्यापासून मुक्त ठेवणे) विधेयक, २०१२ डॉ. निलम गोऱ्हे, वि.प.स. यांचे.

**(१०)** सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक ८ - महाराष्ट्र सक्तीचे निर्बीजीकरण विधेयक, २०१२ श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांचे.

**(११)** सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ३ - महराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) (सुधारणा) विधेयक, २०१३ श्री.मोहन जोशी, वि.प.स. यांचे.

**(१२)** सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ४ - महाराष्ट्र प्रसवपूर्व निदानतंत्राच्या वापराचे

विनियमन करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१३ डॉ.दिपक सावंत, वि.प.स. यांचे.

**(१३)** सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक, २०१३ श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांचे.

**चोवीस : अशासकीय ठराव (म.वि.प. नियम १०२) -**

**डॉ.रणजित पाटील यांचे ठराव क्रमांक १,२,३,४ व ५**

(१) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२) '' विदर्भातील विशेषतः अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ येथील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळे व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधा तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यावश्यक सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी अनेकदा चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांचे झालेले मृत्यू, अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य त्या सर्व सोयी सुविधांचे नियोजन करण्याची नितांत आवश्यकता विचारात घेऊन तशा योजना आखाव्यात व त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

(३) '' राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोग शाळा, ग्रंथालये इत्यादी सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विना अनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४) '' विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प असणे, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असणे, मोठया प्रमाणावर वीज निर्मिती करुनही विदर्भातच मोठया प्रमाणावर भारनियमन होणे, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगताचे होणारे आर्थिक नुकसान, विजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहणे, यामुळे शेतक-यांच्या पिकांचे होणारे प्रचंड नुकसान, विदर्भालगत असलेल्या छत्तीसगढ राज्यात उद्योगांना वीज सवलतीच्या दरात उपलब्ध होत असल्याने उद्योग त्या राज्यात जाणे,परिणामी विदर्भाच्या वाटयाला केवळ प्रदुषण येऊन औद्योगिक विकासही न होणे, बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, विदर्भात उत्पादित उद्योगांना सवलतीच्या दराने वीज पुरवठा करण्याच्या तसेच भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टिने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे.''

(५) '' राज्यात औद्योगिक वसाहती व कारखान्यांचे वाढते प्रमाण, त्यामुळे बहुतांश जिल्हयांत वायू प्रदुषण व जलप्रदुषणाची निर्माण झालेली समस्या, कोळसा खाणीपासून होत

असलेले प्रदूषण, उद्योजक करारनामा करुन देखील प्रदूषणाबाबतचे नियम पाळत नसणे, त्यातच अपुऱ्या साधन सामुग्रीमुळे प्रदूषणावर आळा घालण्याकरिता शासनास येत असलेले अपयश, परिणामी जनतेच्या आरोग्याचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, या सर्वांवर खंबीरपणे आळा धालण्याकरिता शासनाने विशेष प्रभावशाली यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**श्रीमती शोभाताई फडणवीस यांचे ठराव क्रमांक ६,७,८,९ व १०**

(६) '' राज्यात महिलांवरील अत्याचाऱ्यांचे प्रमाण ५० टक्के वर असणे, त्यातच हुंडाबळी, अल्पवयीन मुलीवरील बलात्कार व खून यांचे वाढते प्रमाण, देशात महिलांवरील अत्याचारात राज्याचा नंबर ४ था असणे, राज्यातील न्यायालयात अंदाजे १ लाख २७ हजार महिलांच्या केसेस प्रलंबित असून त्यातील केवळ १०,००० केसेसचा निकाल लागणे व केवळ ४६८ केसेस मध्येच गुन्हेगारांना शिक्षा होणे, हे प्रमाण ०.५ टक्के ही नसणे, त्यामुळे सुटलेल्या गुंडाकडून पुन्हा अत्याचाराची निर्माण झालेली भिती, ह्यावर शासनाने कडक कारवाई करण्याची आवश्यकता, यादृष्टीने एक स्वतंत्र सक्षम यंत्रणा उभारण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७) '' राज्यातील खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पिछेहाट लक्षात घेता क्रिडाक्षेत्राचा सर्वांगीण विकास करणे तसेच दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रिडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, राज्यात देशी खेळांकडे दुर्लक्ष झालेले असून देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागातील होतकरु व तरुण खेळाडू देशी खेळामध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रिडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी प्रोत्साहनपर योजना राबविण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८) '' नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे क्षतीग्रस्त झालेले शेतकरी पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारीत आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका, घ्यावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(९) '' राज्यातील कृषी पंपाचे एकूण २ लाख ८० हजार वीज कनेक्शन द्यावयाचे असून त्यापैकी केवळ १ लाख ३० हजार ७३७ वीज कनेक्शन दिले जाणे, त्यामुळे राज्यातील आवश्यक असलेल्या अर्ध्याहून अधिक कृषी पंपाचे वीज कनेक्शन दिले न गेल्यामुळे शेतकरी सिंचनापासून वंचित राहून शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होणे, ट्रान्सफार्मरवर ज्यादा कनेक्शन असल्यामुळे ट्रान्सफार्मर उडण्याचे घडत असलेले प्रकार ह्याकरिता ज्यादा ट्रान्सफार्मर देण्याची गरज, अर्थसंकल्पीय अधिवेशनात २ लाख ८० हजार कृषी पंपांना वीज देण्याचे दिलेले आश्वासन अद्याप त्यावर न झालेली कारवाई विचारात घेवून खरीब व रब्बी पिक घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना वीज कनेक्शन देण्याबाबत शासनाने ठोस उपाय योजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०) '' राज्यात विशेषत: विदर्भातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ताब्यातील जागा मोठया प्रमाणात रिक्त असणे, त्यांतही काही उद्योजकांनी जागा खरेदी करुन तेथे उद्योग सुरू न करणे, नागपूर विभागात २६८७ उद्योग सुरू असून त्यातून केवळ ०.७१ हजार एवढाच रोजगार उपलब्ध होणे, अमरावती विभागात १५८९ उद्योग सुरू असून त्यातून केवळ ०.१९ हजार रोजगार उपलब्ध होणे, तसेच बुटीबोरी (नागपूर विभाग) या पंचतारांकित औद्योगिक वसाहतीत १९९९ पासून नवीन उद्योग येणे बंद होणे, तसेच बुटीबोरी येथील निवासी भूखंडाची एकूण ५३,५३६ चौ.मिटर जागेची अतिरिक्त मागणी एप्रिल २०११ ला प्रस्ताव पाठवून करुनही परवानगी न मिळणे, वर्धा एम.आय.डी.सी.तील ५० टक्के जागेत उद्योजकांनी जागा घेवूनही १० टक्के उद्योग अद्याप सुरू न होणे, ३ टक्के उद्योजकांनी केवळ बंगले बांधून जागेचा केलेला गैरव्यवहार, त्यामुळे एम.आय.डी.सी.त बेरोजगारांना रोजगार मिळेल हा शासनाचा उद्देश सफल न होणे, शासनाने याबाबत ठोस उपाययोजना राबविण्याची आवश्यकता विचारात घेण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.जयंत पाटील यांचे ठराव क्रमांक ११,१२,१३,१४ व १५**

(११) '' कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्या दृष्टीने पाण्याची निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे विज निर्मितीनंतर वशिष्ठ नदीच्या (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी कोकणातील जिल्ह्यांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या पाण्याची समस्या/दुष्काळ दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने चिपळूण तालुक्यातील वशिष्ठ नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून (लिफ्टिंग) निसर्गाच्या गुरूत्वाकर्षणाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरिता शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२) '' राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१३) '' राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४) '' राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र

विकसित करण्याबाबत तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१५) '' राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, मुंबई- गोवा (वडखळ नाका) नाशिक शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनाची वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गांवर शासनाने ट्रॉमा केअर सेंटर सुरू करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.चंद्रकांत पाटील यांचे ठराव क्रमांक १६,१७,१८ व १९**

(१६) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, यामध्ये अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने तशा योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

(१७) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१८) '' वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासनातर्फे व महानगरपालिकांतर्फे रुग्णवाहिका सुरु न करणे, तसेच अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा आकस्मिक दुखणे, यामुळे सर्वसामान्य लोकांना रुग्णवाहिका सेवा तात्काळ उपलब्ध न होणे, त्यासाठी सामाजिक किंवा राजकीय संस्थांनी विभागा-विभागातून जनसेवेच्या उदात्त हेतूने रुग्णवाहिका सुरु केल्या आहेत, अशा रुग्णवाहिकांसाठी शासनातर्फे आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१९) '' राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.संजय दत्त यांचे ठराव क्रमांक २१,२२,२३,२४ व २५**

(२१) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, यामध्ये अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करावयाच्या दृष्टीने तशा योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

(२२) '' मराठी भाषेसाठी राज्य शासनाने स्थापन केलेल्या स्वतंत्र विभागासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करुन स्वतंत्र सचिवांची नियुक्ती करण्याचा व त्यांच्या कक्षेत भाषा संचालनालय व इतर कार्यालये देण्याचा घेतलेला निर्णय, याचप्रमाणे राज्यातील ग्रामपंचायत स्तरापासून मंत्रालय स्तरापर्यंत आणि ग्रामपंचायत सदस्यांपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्व शासकीय-निमशासकीय कार्यालयात तसेच राज्याच्या एकंदरीत सर्वच व्यवहारामध्ये मराठीचा १०० टक्के वापर करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अथवा त्यात कसूर करण्याऱ्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची जबाबदारी देखील राज्य शासनाने मराठी भाषा विभागाकडे सोपविण्याचा निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२३) '' मुंबई शहरामध्ये अत्यंत मोक्याच्या जागेवर असलेल्या अनेक खाजगी मिल मालकांच्या तसेच राष्ट्रीयकृत कापड गिरण्या बंद पडल्यानंतर गिरण्या ज्याठिकाणी होत्या, त्याठिकाणी गगनचुंबी, इमारती, मॉल खाजगी कंपन्यांच्या इमारती बांधकामास सुरुवात झाली, परंतु सदर जुन्या गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कामगार व त्यांच्या कुटुंबियांना मात्र गिरण्यांच्या जागी उभ्या राहणाऱ्या इमारतींमध्ये राहण्याच्या जागा दिल्या नाहीत. तसेच मॉल, कार्यालय यामध्ये नोक-यासुध्दा दिलेल्या नाहीत, गिरणीच्या जमिनीपैकी विहित हिस्सा अनेक मालकांनी म्हाडा व महापालिकेस दिलेल्या नाहीत. ६७,००० घरे गिरणी कामगारांकरीता बांधणार असे आश्वासन शासनाकडून देण्यात आलेले आहे. तथापि बांधलेली ६,९०० घरे गिरणी कामगारांना केव्हा वितरीत करण्यात येणार आणि राहिलेली ६०,००० घरे केव्हा बांधणार याबद्दल शासनाकडून कोणताही खुलासा नाही. तसेच गिरण्यांच्या चाळीत राहणाऱ्या कामगारांना ३०० चौ.फूटाच्या खोल्या देखील मिळाल्या नाहीत. गेल्या १० वर्षात अनेक कामगार मृत झाले. वर्षानुवर्ष गिरण्यांमध्ये काम केलेल्या कामगारांना गिरण्यांच्या जागेवर घरे देण्याची मागणी शासनाकडे तसेच म्हाडाकडे अनेक वर्षापासून केली जात आहे. म्हणून मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देण्याच्या दृष्टिने शासनाने विहित मर्यादेचा (टाईम बॉंड) कार्यक्रम आखून त्यांची ठोस अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२४) '' राज्यातील पोलिसांना २४ तासाहून अधिक तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे. तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे, अनेक पोलिसांना भाडयाच्याच घरात राहावे लागत आहे. शासनाकडून देण्यात आलेल्या शासकीय निवासाची अत्यंत दुरावस्था आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न, यामुळे त्यांच्यात निर्माण होत असलेले तणावाचे वातावरण, परिणामी त्यांच्यावर मानसिक ताण वाढत असून त्यांच्यात आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे.

म्हणून पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होऊन त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरुपी तोडगा काढण्याच्यादृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(२५) '' राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्ग येथे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरु झाल्यास येथे वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळून राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होईल तसेच अपघातग्रस्तांना वेळीच उपचार होतील. म्हणून राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे.''

**श्री.सुभाष चव्हाण यांचे ठराव क्रमांक २६,२७,२८,२९ व ३०**

(२६) '' कोकणात सिंचनाच्या अपूर्ण सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नापिक नुकसान सहन करीत असून अनेक सिंचन विषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन कोकणाची सिंचनविषयक प्रगती होण्याचे दृष्टीने मोठया प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२७) '' भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे "चैत्यभूमी" दादर,मुंबई येथे स्मारक आहे. तसेच डॉ.आंबेडकर यांचे वास्तव्य दादर येथे हिंदू कॉलनीत राजगृह येथे होते. तेथेच त्यांच्या वापरातील काही वस्तू जतन करुन ठेवण्यात आल्या आहेत. दिनांक १४ एप्रिल व ६ डिसेंबर या दिवशी या महामानवाला अभिवादन करण्यासाठी देशातील लाखो अनुयायी येत असतात. या महामानवाचे नाव चिरंतर स्मरणात रहावे यासाठी दादर रेल्वे स्थानकाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्थानक असे नाव द्यावे अशी राज्यातील सर्व अनुयायी यांची फार पूर्वीपासून मागणी आहे. अतः दादर रेल्वेस्थानकाला "डॉ.बाबासाहेब आंबेडकर" रेल्वेस्थानक असे नाव द्यावे अशी आग्रही भूमिका केंद्र शासनाकडे राज्य शासनाने धरावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(२८) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता राज्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२९) '' कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांची वाढती संख्या विचारात घेता हा मार्ग दुपदरी (सेंकड ट्रॅक) करण्याची आवश्यकता, तसेच या रेल्वेमार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी किमान पत्र्याची कायमस्वरुपी शेड उभारणे, सुलभ शौचालये व अन्य सुविधाअभावी प्रवाशांची विशेषतः महिला प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेता तेथे

तातडीने शौचालये व अन्य अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद राज्य शासनास करीत आहे. ''

(३०) '' ग्लोबल वार्मिंग रोखण्याच्या दृष्टीने राज्यात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम मोठया प्रमाणात राबविणे अत्यंत गरजेचे असल्याने राज्यातील स्वयंसेवी सामाजिक संस्थांना या उपक्रमासाठी उत्तेजनार्थ विशिष्ट योजना राबवाव्यात, यासाठी आर्थिक तरतूद व अन्य उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**डॉ.सुधीर तांबे यांचे ठराव क्रमांक ३१,३२,३३ व ३४**

(३१) '' राज्यातील पोलिसांना २४ तासाहून अधिक तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे. तसेच त्यांना राहण्यासाठी स्वत:ची घरे नसल्याने अनेक पोलिसांना भाडयाच्याच घरात राहावे लागत आहे. शासनाकडून देण्यात आलेल्या शासकीय निवासाची अत्यंत दुरावस्था आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न, यामुळेच त्यांच्यात निर्माण होत असलेले तणावाचे वातावरण, परिणामी त्यांच्यावर मानसिक ताण वाढत असून त्यांच्यात आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. म्हणून पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होऊन त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुटी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरुपी तोंडगा काढण्याच्यादृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३२) '' राज्यातील लोकसंख्येत विविध अपंगांचे ३ टक्क्याहून अधिक प्रमाण आहे. यात मूकबधीर, अंध, मतिमंद व अस्थिव्यंग अशी वर्गवारी आहे. अपंगाच्या पुनर्वसनासाठी योग्य ती प्रभावी योजना नाही. अपंगाना दर्जेदार शिक्षण दिल्यास त्यांचे प्रभावी पुनर्वसन होऊ शकते. प्रचलित शिक्षण व्यवस्थेत अपंगासाठी स्वतंत्र अभ्यासक्रम उपलब्ध नाही. त्यांच्या असलेल्या अपंगत्वाचा व त्यांच्या शक्तीस्थानांचा विचार करून त्यांच्या शिक्षणसाठी स्वतंत्र अभ्यासमंडळ निर्माण करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३३) '' राज्यात पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी सुमारे १ लाख अंगणवाडया आहेत. संख्या समाधानकारक जरी असली तरी या अंगणवाडयाद्वारे दर्जेदार पूर्व प्राथमिक शिक्षण मिळत नाही. वैद्यकीय शास्त्रानुसार लहान मुलांच्या मेंदूची ९० टक्के वाढ ही ६ वर्षापर्यंत होत असते. शैक्षणिक आवड निर्माण होणे, ज्ञानेद्रियांचा योग्य विकास होणे, तसेच बौध्दिक विकासाच्या दृष्टीने हा कालावधी अत्यंत महत्वाचा आहे. यासाठी दर्जेदार शिक्षण देण्यासाठी समिती गठीत करून विशेष कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३४) '' राज्यातील शेतकऱ्यांवर नेहमीच दुष्काळाची छाया पसरलेली असते. कधी ओला दुष्काळ तर कधी सुका दुष्काळ ही परिस्थिती शेतकऱ्यांवर नेहमीच येत असते. यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होतात व यातून त्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या गोवा सरकारने शेतकऱ्यांना पेन्शन योजना सुरु केल्या आहेत. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही राज्यातील दारिद्रय रेषेखालील शेतकऱ्यांना पेन्शन योजना सुरु करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्रीमती अलका देसाई यांचे ठराव क्रमांक ३५,३६,३७,३८ व ३९**

(३५) '' राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३६) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे व पदवीधरांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधीत प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(३७) '' राज्यात विना अनुदानित अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालयांना फी वाढीचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने विनाअनुदानित अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांच्या संचालकांनी फी मध्ये केलेली असमर्थनीय वाढ, सदर फी वाढीमुळे अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांमधून शिक्षण घेणे गरीब, हुशार व होतकरु विद्यार्थ्यांच्या आर्थिक कुवतीबाहेरचे होणे, परिणामी त्यांना अशा महत्वाच्या शिक्षणाला मुकावे लागणे, ही वस्तुस्थिती लक्षात घेता अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयामधील फी भरण्यासाठी अशा हुशार व गुणवान विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत शासनाने आर्थिक सहाय्य कर्जरुपाने उपलब्ध करुन द्यावे व शिक्षण पूर्ण झाल्यावर सदरहू कर्ज हप्त्याहप्त्याने वसूल करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३८) '' कोकण पट्टीवरील विशेषत: ठाणे जिल्हयातील वसई पाचूबंदर, नायगाव कोळीवाडा, किल्ला बंदर येथील किनारपट्टीवरील मच्छीमारांच्या जेटी नादुरुस्त अवस्थेत असणे, तसेच त्यांची उंची कमी असल्यामुळे समुद्राचे पाणी मोठयाप्रमाणात शिरुन मच्छीमार बांधवांचे नुकसान होत असणे, परिणामी मच्छीमार कोळी बांधवांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, या बंदरांची देखभाल व दुरुस्ती करून त्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने शासनाने नियोजनबध्द व कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(३९) '' राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.जयवंतराव जाधव यांचे ठराव क्रमांक ४०,४१, ४२ व ४४**

(४०) '' महाराष्ट्र राज्यातील न्यायालयांमधील कामकाज इंग्रजी भाषेत केले जात आहे, मात्र

राज्यातील न्यायालयांचे कामकाज मराठी या मातृभाषेतून करण्यासाठी, मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा मराठी करण्यासाठी, भारतीय राज्यघटनेचे कलम ३४८(२) नुसार आवश्यक कार्यवाही करण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४१) '' नाशिक हे राज्याच्या सुवर्ण चतु:ष्कोनातील एक महत्वाचे शहर असल्याने नाशिक शहराला लागून असलेल्या ग्रामीण भागाचे झपाटयाने शहरीकरण होत आहे. त्यामुळे येथील पायाभूत सुविधांचा नियोजनबध्द विकास होण्यासाठी एमएमआरडीए मुंबई व नागपूर सुधार प्रन्यास व पुणे, पिंपरी, चिंचवड महानगर प्राधिकरणाच्या धर्तीवर "नाशिक स्थापन विकास प्राधिकरण" कार्यान्वीत क्षेत्र स्थापन करुन हया प्राधिकरणाला निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४२) '' राज्यातील समाजकल्याण, आदिवासी विकास विभाग आणि महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम तयार करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४४) '' राज्यातील सहकार क्षेत्रातील साखर कारखाने, सूतगिरण्या, मध्यवर्ती बँका, खरेदी विक्री संघ, ॲपेक्स मार्केटिंग सोसायटया व शिखर बँका इ. संस्थांत राज्य शासनाने केलेली कोटयावधी रुपयांची गुंतवणूक लक्षात घेता उपरोक्त संस्थांच्या प्रशासकीय व आर्थिक कारभारावर योग्य प्रकारचे नियंत्रण ठेवण्यासाठी "लोकलेखा" समितीच्या धर्तीवर दोन्ही सभागृहाची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.हेमंत टकले यांचे ठराव क्रमांक ४५,४६,४७ व ४८**

(४५) "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे "चैत्यभूमी" दादर,मुंबई येथे स्मारक आहे. तसेच डॉ.आंबेडकर यांचे वास्तव्य दादर येथे हिंदू कॉलनीत राजगृह येथे होते. तेथेच त्यांच्या वापरातील काही वस्तू जतन करुन ठेवण्यात आल्या आहेत. दिनांक १४ एप्रिल व ६ डिसेंबर या दिवशी या महामानवाला अभिवादन करण्यासाठी देशातील लाखो अनुयायी येत असतात. या महामानवाचे नाव चिरंतर स्मरणात रहावे यासाठी दादर रेल्वेस्थानकाला "डॉ.बाबासाहेब आंबेडकर" रेल्वेस्थानक असे नाव द्यावे अशी राज्यातील सर्व अनुयायी यांची फार पूर्वीपासून मागणी आहे. अत: दादर रेल्वेस्थानकाला "डॉ.बाबासाहेब आंबेडकर" रेल्वेस्थानक असे नाव द्यावे अशी आग्रही भूमिका केंद्र शासनाकडे राज्य शासनाने धरावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४६) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा" अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत

आहे. ''

(४७) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्यासाठी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४८) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, यामध्ये अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने तशा योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे. ''

**श्री.दिवाकर रावते यांचे ठराव क्रमांक ५०,५१,५२ व ५३**

(५०) '' राज्य शासनाने अधिकारी / कमर्चारी यांच्या बदल्याबाबत अधिनियम केला आहे, बदली करण्यात आलेले काही अधिकारी/ कर्मचारी राज्य शासनाच्या आदेशाविरुध्द मॅटमध्ये जातात. बदली आदेशास स्थगिती मिळवितात. सदर स्थगितीच्या कालावधीत बदली केलेले अधिकारी/ कमर्चारी वर्षानुवर्षे पूर्वीच्याच जागेवर राहतात. त्यामुळे बदल्याबाबतचा कायदा परिणामशून्य होतो. परिणामी बदल्यासंदर्भात केलेल्या अधिनियमाखालील हेतू सफल होत नाही व अशी प्रकरणे दिवसेंदिवस वाढत चालली आहेत हे विचारात घेवून शासनाने आवश्यक ती कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५१) '' संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या आंदोलनात मृत्यूमुखी पडलेल्या १०५ व्यक्तींना राज्य शासनाने हुतात्म्यांचा दर्जा दिला आहे. त्याप्रमाणेच महाराष्ट्र-कर्नाटक सीमा आंदोलनात १९६९ मध्ये मृत्यूमुखी पडलेल्या ६९ मराठी व्यक्तींनाही राज्य शासनाने हुतात्म्यांचा दर्जा द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५२) '' मराठी भाषेसाठी राज्य शासनाने स्थापन केलेल्या स्वतंत्र विभागासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करुन स्वतंत्र सचिवांची नियुक्ती करण्याचा व त्यांच्या कक्षेत भाषा संचालनालय व इतर कार्यालये देण्याचा घेतलेला निर्णय, तरी राज्यातील ग्रामपंचायत स्तरापासून मंत्रालय स्तरापर्यंत आणि ग्रामपंचायत सदस्यांपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयात तसेच राज्याच्या एकंदरीत सर्वच व्यवहारामध्ये मराठीचा १०० टक्के वापर होण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे, तसेच, कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अथवा त्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची जबाबदारी देखील राज्य शासनाने मराठी भाषा विभागाकडे सोपविण्याचा निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५३) '' ज्यांच्या हौतात्म्यातून महाराष्ट्र राज्य निर्माण झाले, त्या संयुक्त महाराष्ट्रासाठी बलिदान दिलेल्या १०५ हुतात्म्यांची आठवण, आदर व सन्मान राखण्यासाठी मुंबईतील हुतात्मा चौकात स्मारक उभारुन अखंड ज्योत तेवत ठेवण्यात आली आहे. या हुतात्म्यांचा सन्मान करण्यासाठी गिरणी कामगारांच्या मोफत घरांच्या पहिल्या लॉटरीमध्ये हुतात्मा झालेल्या गिरणी कामगारांना विशेष बाब म्हणून घरे देण्याचा शासनाचा निर्णय स्वागतार्ह आहे. परंतु, प्रत्यक्षात सदर लॉटरीमध्ये १०५ पैकी केवळ २३ गिरणी कामगारांना घरे मिळाल्यानंतर उर्वरित ८२ हुतात्मे गिरणी कामगार नव्हते म्हणून त्यांना मोफत घरे न देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. शासनाचा पूर्वी घेतलेला निर्णय सुसंगत असावा म्हणून सदर ८२ हुतात्म्यानाही इतर गिरणी कामगारांप्रमाणेच मोफत घरे देण्याबाबत शासनाने निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**डॉ.निलम गोऱ्हे यांचे ठराव क्रमांक ५४,५५,५६,५७ व ५८**

(५४) '' राज्याच्या ग्रामीण भागामध्ये आदिवासी महिला तसेच सामाजिकदृष्टया वंचित घटकांना स्थानिक पातळीवर न्याय व संरक्षण मिळावे, यासाठी तंटा मुक्ती समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. त्याचधर्तीवर शहरी भागातसुध्दा तंटा मुक्ती समित्या स्थापन करण्यात याव्या व अदखलपात्र गुन्हांचा निपटारा करून समाजात सलोख्याचे वातावरण निर्माण व्हावे म्हणून शासनाने याबाबत तातडीने निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे ''

(५५) '' मृत स्त्री अर्भके सापडल्यांचे अनेक प्रकार राज्यात वरचेवर उघडकीस येणे, या प्रकरणी तपास करून पोलिसांमार्फत संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येणे, सदर प्रकरणांत स्त्री भ्रणू हत्या झालेल्यांचे नातेवाईक पुढे न आल्यामुळे पोलिसांना तपास करण्यास अडचणी निर्माण होणे, शिवाय स्त्री भ्रूण हत्येप्रकरणी संबधित रुग्णालयांवर गुन्हे दाखल केल्यावर न्यायालयात खटले चालविण्यासाठी निष्णात वकिलांची आवश्यकता असणे, तथापि अशी प्रकरणे हाताळण्यासाठी सरकारी वकील दुर्लक्ष करणे, पर्यायाने स्त्री भ्रूण हत्या करण्यांवर कडक शासन होण्यासाठी सरकारी वकील न मिळणे, या सर्व पार्श्वभूमीवर स्त्री भ्रूण हत्येंची प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यासाठी राज्यात विशेष न्यायालय स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५६) '' महिला आर्थिक विकास महामंडळाची २० जानेवारी, २००३ रोजी पुनर्रचना करण्यात येऊन ५ फेब्रुवारी, २००७ रोजी या महामंडळाला शिखरसंस्था म्हणून घोषित करण्यात आले आहे. राज्यात बचत गटांचे कामकाज ग्रामविकास, नगरविकास, आदिवासी कल्याण, महिला बालकल्याण, सामाजिक न्याय व सहकार खात्याशी संलग्न पतपेढ्या, तसेच कृषि विभागाशी संबधित विविध संस्थांमार्फत चालविले जात आहे. परंतु त्यात सध्या समन्वय नसल्याने महाराष्ट्र स्तरावर यासर्व बचत गटांमध्ये सुसूत्रीकरण, मार्गदर्शन, संस्थात्मक सक्षमीकरण या कामांसाठी महिला आर्थिक विकास महामंडळाला ५० कोटी रुपये निधी भागभांडवल व कार्यक्रमाचा आराखडा बनविण्यास देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५७) '' सुमारे २१०० कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वरील अपघातांचे प्रमाण खूपच वाढत आहे. अलिकडे प्रख्यात अभिनेते आनंद अभ्यंकर, अक्षय पेंडसे यांचे उर्से फाट्याजवळ अशाच एका अपघातात झालेले मृत्यू, तसेच याच ठिकाणी यापूर्वी देखील अनेक अपघात झालेले असणे, या सर्व बाबी विचारात घेऊन या एक्सप्रेस वे

वर दुभाजकांची उंची वाढविणे, खोल असलेले चर खणून, वाहन चालकांकडून होत असलेले वेग मर्यादेचे उल्लंघन रोखणे, ठराविक अंतरावर स्वंतत्र पोलीस ठाणे उभारुन पोलीसांची गस्त वाढविणे, ट्रामा केअर सेंटर उभारणे इत्यादी बाबींची त्वरीत पुतर्ता करण्याच्या दृष्टीने शासनाने एक विशेष मोहिम आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५८) '' जिल्हा सातारा येथील मांढरदेवीच्या यात्रेमध्ये दिनांक २५ जानेवारी, २००५ रोजी झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेची चौकशी करण्याकरीता न्या.कोचर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. रुंद रस्ते, पायऱ्या, सुरक्षा आणि तातडीची आरोग्य सेवा इत्यादी संदर्भात पुरेशा सोई करण्यात आलेल्या नाहीत. राज्यात अशी अनेक धार्मिक स्थळे असून त्या ठिकाणी दरवर्षी भाविकांचे वाढते प्रमाण विचारात घेता मांढरदेवीसारखी दुर्घटना पुन्हा घडू नये यादृष्टीने न्या.कोचर यांच्या समितीने केलेल्या शिफारशींवर त्वरीत कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**डॉ.दिपक सावंत यांचे ठराव क्रमांक ५९,६० व ६१**

(५९) '' राज्यातील रुग्णांना भासणारी रक्ताची निकड पाहता आणि रक्तदानाचे महत्व विचारात घेवून सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान होणे गरजेचे आहे. यासाठी रक्त संक्रमण परिषदेने फक्त रक्तदान दिवस साजरा न करता त्यांना विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी शासनाने या परिषदेस विशेष निधी द्यावा व त्यासाठी विशेष समिती नेमून त्यांचे नियंत्रण करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद राज्य शासनास करीत आहे ''

(६०) '' मुंबईतील एकूण वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या राज्यातील इतर शहरातील वैद्यकीय महाविद्यालयापेक्षा जास्त आहे. त्यातून वैद्यकीय पदवी घेणारे डॉक्टर्स मुंबईतील स्थानिक लोकसंख्या, बाहेरील जिल्ह्यांतून व राज्यातून येणारी रुग्ण संख्या, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची गरज, यासाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठासारखे मुंबईसाठी स्वतंत्र "मुंबई आरोग्य विज्ञान विद्यापीठ" स्थापन करावेत अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६१) '' राज्यातील ग्रामीण आरोग्य व्यवस्था सुधारण्याकरिता जिल्हा पातळीवर असलेल्या जिल्हा रुग्णालयांमध्ये (Civil Hospital) सी.पी.एस. सारखे अभ्यासक्रम सुरू करण्याची नितांत आवश्यकता, ज्यामध्ये शल्य चिकित्सा शास्त्र अभ्यासक्रम (Non Surgical Faculty) सोडून इतर आवश्यक अभ्यासक्रमांचा समावेश असेल, त्यामुळे ग्रामीण रुणांना योग्य आरोग्य सेवा उपलब्ध होईल. यामध्ये बाल रोगतज्ञ, त्वचा रोगतज्ञ, पॅथॉलॉजिस्ट (Pathologist) इत्यादी विविध अभ्यासक्रम देखील अंतर्भूत करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करित आहे. ''

**श्री.रामदास कदम यांचे ठराव क्रमांक ६२,६३,६४,६५ व ६६**

(६२) '' राज्यातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देवून त्याठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व त्यायोगे रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी तसेच यासर्व पर्यटन स्थळांचे महत्व कायम राखण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६३) '' कोकणातील विशेषत: रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी कोयना धरणाचे पाणी व या दोन्ही जिल्हयात सर्वात जास्त पाऊस कोकणात पडतो, सदर पावसाचे पाणी अडवून ते कोकणातील वरकस जमिनीला देण्यासाठी पाणी पुरविण्याचेदृष्टीने शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून त्यांची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६४) '' कोकणात सिंचनाच्या अपुऱ्या सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नापिकी आणि नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेवून कोकणाची सिंचनविषयक प्रगती होण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६५) '' राज्यात विशेषत: पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्यादृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्यांची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६६) '' मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.रमेश शेंडगे यांचे ठराव क्रमांक ६७,६८,६९ व ७०**

(६७) '' शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा वा महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा वा महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६८) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्यासाठी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६९) '' राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या

अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्ग येथे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरु झाल्यास येथे वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळून राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होईल तसेच अपघातग्रस्तांना वेळीच उपचार होतील. म्हणून राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे.''

(७०) '' भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे "चैत्यभूमी" दादर,मुंबई येथे स्मारक आहे. तसेच डॉ.आंबेडकर यांचे वास्तव्य दादर येथे हिंदू कॉलनीत राजगृह येथे होते. तेथेच त्यांच्या वापरातील काही वस्तू जतन करुन ठेवण्यात आल्या आहेत. दिनांक १४ एप्रिल व ६ डिसेंबर या दिवशी या महामानवाला अभिवादन करण्यासाठी देशातील लाखो अनुयायी येत असतात. या महामानवाचे नाव चिरंतर स्मरणात रहावे यासाठी दादर रेल्वे स्थानकाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्थानक असे नाव द्यावे अशी राज्यातील सर्व अनुयायी यांची फार पूर्वीपासून मागणी आहे. अत: दादर रेल्वेस्थानकाला "डॉ.बाबासाहेब आंबेडकर" रेल्वेस्थानक असे नाव द्यावे अशी आग्रही भूमिका केंद्र शासनाकडे राज्य शासनाने धरावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**श्री.विनायकराव मेटे यांचे ठराव क्रमांक ७१**

(७१) '' भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या थोर महामानवाचे दिनांक ६ डिसेंबर, १९५६ रोजी निधन झाले. या महामानवाचे अंत्यसंस्कार दादर येथे अथांग सागराच्या साक्षीने करण्यात आले. या पवित्र स्थानास "चैत्यभूमी" या नावाने संपूर्ण भारत ओळखू लागला. डॉ.आंबेडकर यांचे आयुष्यातील काही काळ हिंदू कॉलनीत राजगृह, मुंबई येथे वास्त्यव्य होते. आजही राजगृहात डॉ.आंबेडकरांच्या वस्तुंचा संग्रह पाहण्यासाठी आणि "चैत्यभूमी" या पवित्र ठिकाणापुढे नतमस्तक होण्यासाठी देशभरातून लाखो-करोडो अनुयायी वर्षभरात येत असतात. अशा या महामानवाचे नाव चिरंतर स्मरणात रहावे यासाठी दादर रेल्वेस्थानकाला "चैत्यभूमी" असे नाव द्यावे. ही सर्व आंबेडकर प्रेमींची भावना आहे. ही भावना जपण्यासाठी व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव चिरंतन राहण्यासाठी दादर रेल्वेस्थानकाला "चैत्यभूमी" असे नाव द्यावे. अशी आग्रही विनंती केंद्र शासनाला करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**प्रा.सुरेश नवले यांचे ठराव क्रमांक ७२,७३,७४,७५ व ७६**

(७२) '' केंद्र सरकारने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्राम सडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७३) '' राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोग शाळा, ग्रंथालये इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विना अनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद

शासनास करीत आहे. ''

(७४) '' राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेला दर्जा लक्षात घेता व प्रकरणी आमुलाग्र सुधारणा करण्यासाठी शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७५) '' राज्यात कायदा व सुव्यवस्थेची दिवसेंदिवस ढासळत असलेली आणि गंभीर होत चाललेली परिस्थिती, तसेच पोलिसांना गुन्हे शोधून काढण्यात येत असलेले अपयश, वाढत्या गुन्हेगारीमुळे ग्रामीण व शहरी भागातील जनतेत निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना विचारात घेता, या संदर्भात अभ्यास करुन निश्चित उपाय सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सदनातील सदस्यांची एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७६) '' राज्यात अनेक ठिकाणी धरणासारख्या प्रकल्पांमध्ये ज्यांची घरे व जमिनी गेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची कामे विनाविलंब व निश्चितपणे पूर्ण होतील, या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.विनायक राऊत यांचे ठराव क्रमांक ८२,८३,८४,८५ व ८६**

(८२) '' कोकण रेल्वे सुरु होऊन सुमारे १३ वर्षाहून अधिक कालावधी लोटला तरीही आजमितीस या मार्गावर एकमार्गी (Singal Track) वाहतूक सुरू असणे, कोकणातील जनतेने या मार्गासाठी आवश्यक असलेली आपली बहुमूल्य जमिन कोकण रेल्वेसाठी उपलब्ध करुन दिलेली असतानाही कोकणातील विशेषत: सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील जनतेसाठी मोजक्याच रेल्वे गाड्या असल्याने या रेल्वेचा विशेष फायदा कोकणातील जनतेला होत नसल्याकारणाने कोकण रेल्वे एकेरी मार्गाचे विस्तारीकरण करुन दुहेरी मार्ग सुरू करण्याच्या दृष्टीने तसेच कोकणातील प्रवाशांच्या संख्येत वाढ झाल्याने प्रवाशांच्या सोयीसाठी आरक्षण वाढविणे, या रेल्वे मार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांसाठी पत्र्याची शेड उभारणे, महिला प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेता तेथे सुलभ शौचालय व अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद राज्य शासनास करीत आहे. ''

(८३) '' कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्या दृष्टीने पाण्याची निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे वीज निर्मितीनंतर वशिष्ठ पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून (लिफ्टिंग) निसर्गाच्या गुरूत्वाकर्षणाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला व ठाणे, मुंबई शहराला पुरविण्याकरिता शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून एक महत्वांकाक्षी योजना तयार करण्यासाठी निष्णात तज्ञांची समितीची नियुक्ती करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद राज्य शासनास करीत आहे. ''

(८४) '' मुंबईतील छत्रपती शिवाजी टर्मिनस रेल्वे स्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह

धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद राज्य शासनास करीत आहे. ''

(८५) '' राज्यातील औद्योगिक वसाहती व कारखान्यांचे प्रमाण वाढत असल्यामुळे बहुतांश जिल्ह्यात वायु व जल प्रदुषणाचे प्रमाण वाढत असणे, त्यातच, कोळसा खाणींपासून होणारे प्रदुषण, उद्योजक कराराननामा करुनही प्रदुषणाबाबत असलेल्या नियमांचे उल्लंघन करीत असणे, अपुऱ्या साधन सामुग्रीमुळे प्रदुषणाला आळा घालण्यात शासनास येत असलेले अपयश. परिणामी जनतेच्या आरोग्यास निर्माण झालेला गंभीर धोका विचारात घेऊन सर्वच स्तरावरील वाढत्या प्रदुषणाला आळा घालण्याकरीता शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद राज्य शासनास करीत आहे. ''

(८६) '' मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीबाबत शासनाचे उदासीन धोरण, तसेच मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींची दुरुस्ती होत नसल्याने प्रत्येकवर्षी ऐन पावसाळ्यात इमारती कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचे वाढते प्रमाण. म्हाडाकडून पावसाळ्यापूर्वी जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरीत्या पाहणी न होणे तसेच, पुनर्रचीत इमारतींची खोळंबलेली असंख्य कामे, त्यातून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराला मिळणारे उत्तेजन त्यामुळे रहिवांशात पसरलेला तीव्र असंतोष व त्याच्यांत वाढती असुरक्षितता. या संदर्भात शासनाने विचार करुन त्यावर परिणामकार उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद राज्य शासनास करीत आहे. ''

**श्रीमती विद्या चव्हाण यांचे ठराव क्रमांक ८७,८८,८९,९० व ९१**

(८७) '' मुंबईसह राज्यात मोठ्या प्रमाणात रस्त्यावर थुंकणे, कचरा टाकणे, अस्वच्छता ठेवणे असे प्रकार घडत असून यामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात खर्च याठिकाणी स्वच्छता राखण्यात होत आहे. अशाप्रकारच्या बेशिस्त वागण्यावर नियंत्रण आणण्यासाठी व लोकांमध्ये समाजाप्रती व देशाप्रती नैतिकता जागरुक करुन स्वत:च्या जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याकरीता शालेय शिक्षणापासून नागरिक शास्त्र हा विषय १०० गुणांसाठी करुन त्यांतून चांगला माणूस निर्माण करणारे शिक्षण देण्याचा कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(८८) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, यामध्ये अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने तशा योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे''

(८९) '' मुंबईसह राज्यात सदनिकांच्या किंमती प्रचंड प्रमाणात वाढणे, सदरहू सदनिकांच्या किंमती मूळ किंमतीपेक्षा कितीतरी पट अधिक असल्याने सर्वसामान्य ग्राहक जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे, सर्वसामान्य जनतेला मोठे घर घेण्याची ऐपत नसल्यामुळे त्यांच्यासाठी लहान घरे बांधण्याची विकासकांवर सक्ती करण्याची आवश्यकता, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करुन स्थिर ठेवण्याची राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी,

सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी खाजगी बांधकाम व्यवसायिकांनी खरेदी केलेली जमिन आणि बांधकामाचा खर्च गृहीत धरुन एरियावाईज प्रति चौरस फूट याप्रमाणे शासनाने घरांच्या किंमती जाहीर करुन व वाढते दर नियंत्रित करुन सर्वसामान्य जनतेला परवडतील अशा किंमतीत घर देण्याबाबत राज्य शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(९०) '' राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतूकीस योग्य व्हावीत याकरिता सर्व ग्रामीण रस्त्यांची पाहणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, खाड्या, नाले व मोऱ्या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना हाती घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९१) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्यासाठी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.मितेश भांगडिया यांचे ठराव क्रमांक ९२,९३,९४ व ९५**

(९२) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९३) '' राज्यात अनेक ठिकाणी धरणासारख्या प्रकल्पांमध्ये ज्यांची घरे व जमिनी गेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची कामे विनाविलंब व निश्चितपणे पूर्ण होतील, या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९४) '' राज्यात विना अनुदानित अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालयांना फी वाढीचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने विनाअनुदानित अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांच्या संचालकांने फी मध्ये केलेली असमर्थनीय वाढ, सदर फी वाढीमुळे अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांमधून शिक्षण घेणे गरीब, हुशार व होतकरु विद्यार्थ्यांच्या आर्थिक कुवतीबाहेरचे होणे, परिणामी त्यांना अशा महत्वाच्या शिक्षणाला मुकावे लागणे, ही वस्तुस्थिती लक्षात घेता अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयामधील फी भरण्यासाठी अशा हुशार व गुणवंत विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत शासनाने आर्थिक सहाय्य कर्जरुपाने उपलब्ध करुन द्यावे व शिक्षण पूर्ण झाल्यावर सदरहू कर्ज हप्त्याहप्त्याने वसूल करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९५) '' राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व

भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्यादृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.रामनाथ मोते यांचे ठराव क्रमांक ९६,९८ व ९९**

(९६) '' औरंगाबाद व नागपूर येथील मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या धर्तीवर पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर या जिल्ह्यातील जनतेच्या सोयीच्या दृष्टीने कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची निर्मिती करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९८) '' राज्यातील सर्व धर्मादाय शैक्षणिक संस्थांचे प्रशासन होण्यासाठी सदर संस्थांचा कारभार पहाण्यासाठी स्वतंत्र धर्मादाय आयुक्तालयाची निर्मिती करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९९) '' राज्यातील विविध विभागांच्या (आदिवासी, सामाजिक न्याय, ग्रामविकास इ.) प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांचे नियंत्रण करण्यासाठी एकच विभाग असावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप यांचे ठराव क्रमांक १००,१०१,१०२,१०३ व १०४**

(१००) '' मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०१) '' राज्यात रस्त्यावरील वाहनांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ, त्यामानाने रस्ते अरुंद व तसेच वाहतुक सिग्नल योग्य नसल्याने व राज्यातील द्रुतगती मार्गाची योग्य ती देखभाल होत नसल्याने राज्यात वाहनांच्या अपघातात झालेली लक्षणीय वाढ, रस्त्यावरील अपघातामुळे होणारी जिवित व वित्तहानी लक्षात घेता राज्यातील रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाय सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०२) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगारांअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षांत घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०३) '' राज्यात अनेक कुटूंबाचे योग्य सर्वेक्षण न झाल्याने त्यांना दारिद्र्य रेषेखालील पिवळ्या शिधापत्रिकापासून वंचित रहावे लागत असणे, शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा

विभागाने रुपये १५,०००/- वार्षिक उत्पन्न ही दारिद्र्यरेषेची मर्यादा १० वर्षापूर्वी ठरविली असणे, तसेच शासनाने नेहरु रोजगार व सुवर्ण जयंती योजनेसाठी दारिद्र्य रेषेची मर्यादा रुपये २५,०००/- ठरविले असणे, यामध्ये स्वतःच्या मालकीचे घर, टि.व्ही., गॅस, दुचाकी वाहन या अटी शिथिल केल्या असणे, एकाच शासनाचे दारिद्र्य रेषेखाली असलेले दोन निकष हे विसंगत असणे, यात धान्य वाटपासाठी केंद्र शासनाने ६५.३४ लाख लाभार्थ्यांची संख्या ठरवून दिली असून प्रत्यक्षात ७३.४० लाख लाभार्थी निवडण्यात आले असणे, त्यामुळे केंद्राकडून मिळणारे धान्य अपुरे असल्याने, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचे वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रुपये १५,०००/- वरुन रुपये ५०,०००/- करण्यात यावी व केंद्र शासनाकडून अतिरिक्त धान्याचा कोटा राज्यास देण्याची शासनाने मागणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०४) '' मुंबईसह राज्यात सदनिकांच्या किंमतीत प्रचंड प्रमाणात वाढ होणे, सदरहू सदनिकांच्या किंमती मूळ किंमतीपेक्षा कितीतरी पट अधिक असल्याने सामान्य व गरीब जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर असणे, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करुन स्थिर ठेवण्याची राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी राज्य शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री. अनिल तटकरे यांचे ठराव क्रमांक १०६,१०७,१०८ व १०९**

(१०६) '' मुंबईसह राज्यात सदनिकांच्या किंमती प्रचंड प्रमाणात वाढणे, सदरहू सदनिकांच्या किंमती मूळ किंमतीपेक्षा कितीतरी पट अधिक असल्याने सर्वसामान्य ग्राहक जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे, सर्वसामान्य जनतेला मोठे घर घेण्याची ऐपत नसल्यामुळे त्यांच्यासाठी लहान घरे बांधण्याची विकासकांवर सक्ती करण्याची आवश्यकता, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करुन स्थिर ठेवण्याची राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी खाजगी बांधकाम व्यवसायिकांनी खरेदी केलेली जमिन आणि बांधकामाचा खर्च गृहीत धरुन एरियावाईज प्रति चौरस फूट याप्रमाणे शासनाने घरांच्या किंमती जाहीर करुन व वाढते दर नियंत्रित करुन सर्वसामान्य जनतेला परवडतील अशा किंमतीत घर देण्याबाबत राज्य शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(१०७) '' कोकणातील सागरी किनारपट्टीलगतच्या गावांना समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून होणाऱ्या नुकसानीपासून वाचविण्यासाठी तज्ञांची एक समिती नेमून सागरी अतिक्रमण बचावासाठी एक मास्टर प्लॅन तयार करण्यात यावा व त्याची युध्द पातळीवर अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१०८) '' राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, मुंबई- गोवा (वडखळ नाका) नाशिक-शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनाची वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गांवर शासनाने अपघातग्रस्तांवर वेळीच उपचार होतील अशा पध्दतीने ठराविक काही किलोमीटर अंतरावरती प्राथमिक आरोग्य केंद्र उभे करावीत व त्या प्रत्येक केंद्रामध्ये एक रुग्णवाहिका ठेवावी, अशी शिफारस ही विधानपरिषद राज्य शासनास करीत आहे. ''

(१०९) '' कोकणातील विशेषत: रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग व ठाणे या चार जिल्हयांसाठी एक स्वतंत्र मत्स्य विद्यापीठ स्थापन करुन त्यात मत्स्यव्यवसायासंबंधी विविध अभ्यासक्रम अंतर्भूत करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**ॲड. निरंजन डावखरे यांचे ठराव क्रमांक ११०, १११, ११३ व ११४**

(११०) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकासारख्या आर्थिक संस्थाकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी व सुशिक्षित बेरोजगारांना पुन्हा सुशिक्षित बेरोजगार भत्ता सुरू करावा, रोजगारासाठी आवश्यक असलेल्या भागभांडवलाची तरतूद करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१११) '' राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्यायावत पध्दतीने योग्य प्रकारे पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११३) '' ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विद्यार्थी संख्या व शैक्षणिक कामांसाठी वारंवार मुंबईला मारावे लागणारे हेलपाटे तसेच त्या भागातील आदिवासी लोकसंख्या, डोंगराळ व दुर्गम भाग विचारात घेता कोकण प्रदेशासाठी एक स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११४) ''भारतीय संविधानाचे अनुच्छेद ३७१(२) अन्वये राज्यातील मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रासाठी यापूर्वी स्थापन करण्यात आलेल्या वैधानिक विकास मंडळाच्या धर्तीवर "कोकण प्रदेशासाठी स्वतंत्र वैधनिक विकास मंडळ" स्थापन करण्याबाबत राज्य शासनाने कार्यवाही करुन त्याबाबत केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

**श्री.अनिल भोसले यांचे ठराव क्रमांक ११५,११७,११८ व ११९**

(११५) '' पुणे, पिंपरी-चिंचवड व पुणे ग्रामीण भागाचे वेगाने होणारे शहरीकरण, त्या मानाने या भागात रस्त्यांचा विकास न झाल्याने वाहतुकीची होत असलेली प्रचंड कोंडी, सुलभ व जलद वाहतुकीसाठी तेथे सोईसुविधांचा असलेला अभाव, या परिस्थितीवर तोडगा निघावा यासाठी पुणे-पिंपरी- चिंचवड व पुणे शहराच्या आसपासच्या भागाच्या विकासासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर पुणे विकास प्राधिकरण नेमून त्याकरिता शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११७) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व यांच्यात रोजगारांअभावी

निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षांत घेता बेरोजगारीची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११८) '' मानवतेचे महाभाष्याकार असलेल्या श्री.संत ज्ञानेश्वर महाराजांचे उचित स्मारक उभारुन त्यांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या नेवासे परिसराचा सर्वांगिण विकास करण्यासाठी शासनाने एक कालबध्द योजना आखून त्याची त्वरेने अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११९) '' पुणे शहरात दिवसेंदिवस वाहनांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ होत असल्याने वाहतुकीची होणारी कोंडी, अपघातात होत असलेली वाढ, यामुळे पुणे शहाराच्या वाहतुकीचा झालेला जटील प्रश्न, याबाबत पुणे शहाराच्या गतिशीलतेसाठी सर्वकष आराखडा तयार करुन त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.संजय पाटील यांचे ठराव क्रमांक १२०,१२१,१२२ व १२४**

(१२०) '' महाराष्ट्रात रोजगार हमी योजना अनेक वर्षापासून सुरु असून त्यात ग्रामीण विभागातील कामे करण्यात येतात, सदर योजनेचे धोरण हे ग्रामीण भागामतील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन राष्ट्रीय मालमत्तेची निर्मिती करणे हे आहे, महाष्ट्राच्या या योजनेला अनुसरुनच केंद्र शासनाने नेरगो ही योजना सुरु केली आहे, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात मजूरांची उपलब्धतता कमी होत आहे. त्याचप्रमाणे मजूरीचे दरही वाढलेले आहेत. तसेच कोरडवाहू अल्पभूधारकाला शेती परवडत नाही. या सर्व बाबी लक्षात घेवून अल्पभूधारक कोरडवाहू शेतकऱ्यांच्या शेतीच्या कामांचा समावेश रोजगार हमी योजनेमध्ये करावा अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२१) '' शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा वा महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा वा महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२२) '' राज्यातील शेतकऱ्यांवर नेहमीच दुष्काळाची छाया पसरलेली असते. कधी ओला दुष्काळ तर कधी सुका दुष्काळ ही परिस्थिती शेतकऱ्यांवर नेहमीच येत असते. यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होतात व यातून त्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या गोवा सरकारने शेतकऱ्यांना पेन्शन योजना सुरु केल्या आहेत त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही राज्यातील दारिद्रय रेषेखालील शेतकऱ्यांना पेन्शन योजना सुरु करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२४) '' राज्यातील सर्व शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी कर्जे ४ टक्के व्याजाच्या दराने पुरविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.सतीश चव्हाण यांचे ठराव क्रमांक १२५,१२६,१२७,१२८ व १२९**

(१२५) '' राज्यात दिवसेंदिवस वाढत चालेलली महागाई तसेच सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी करुनही सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी प्राप्त न होणे. सेवायोजन कार्यालयाकडून १९८५ पासून नोकरीसाठी मुलाखत पत्र न देणे, परिणामी बेरोजगारांना चरितार्थासाठी कोणतेही साधन उपलब्ध न झाल्याने चरितार्थ चालविणे जिकरीचे झाले आहे. म्हणून प्रतिमहा रुपये १५००/- बेकार भत्ता देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२६) '' केंद्र सरकारने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्राम सडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२७) '' राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्यायावत व योग्य पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२८) '' राज्यातील खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पिछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरीता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२९) '' राज्यातील ग्रामीण भागातील जिल्हापरिषद शाळांची झालेली दयनीय अवस्था विचारात घेऊन शाळांसाठी कंपाऊंड वॉल, पाण्याची सुविधा, मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, वृक्षारोपण यासाठी महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषदांना आवश्यक तो विशेष निधी देण्याच्या दृष्टीने कारवाई करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**डॉ. अपूर्व हिरे यांचे ठराव क्रमांक १३१,१३२,१३३ व १३४**

(१३१) '' राज्यात रस्त्यावरील वाहनांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ, त्यामानाने रस्ते अरुंद तसेच वाहतुक सिग्नल योग्य नसल्याने व राज्यातील द्रुतगती मार्गाची योग्य ती देखभाल होत नसल्याने राज्यात वाहनांच्या अपघातात झालेली लक्षणीय वाढ, रस्त्यावरील अपघातामुळे होणारी जिवित व वित्तहानी लक्षात घेता राज्यातील रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाय सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१३२) '' राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर

नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१३३) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्यासाठी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१३४) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**पंचवीस** : सर्वसाधारण सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबी.

**सव्वीस** : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी स्वंतत्रपणे वितरीत करण्यात आली आहे.)

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १० जुलै, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानपरिषद.